जा.क्र.५२८/आशा-१/प्रलि/पोशि भरती-२०१९/जाहिरात/२०२१
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
फोन नं. ०२५७-२२२०४११, फॅक्स नं. २२२०५११
email id - sp.jalgaon@mahapolice.gov.in
दिनांक :- ०१/११/२०२१

**पत्र/ईमेल**

**संदर्भ :-** जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ अनुषंगाने या कार्यालयास प्राप्त तक्रार/विनंती अर्ज.

**विषय :- पोलीस शिपाई भरती -२०१९.**
लेखी परीक्षा निकाल व मैदानी चाचणीसाठी पात्र उमेदवारांचे गुणवत्ता यादीच्या अनुषंगाने प्राप्त हरकती/ तक्रारी व विनंती अर्ज.

---ooo---

**जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ लेखी परीक्षा निकाल व शारीरीक चाचणीसाठी पात्र उमेदवारांचे गुणवत्ता यादी बाबत या कार्यालयाकडे प्राप्त हरकती/आक्षेप विनंती अर्ज यांचा आढावा घेऊन जळगांव जिल्हा पोलीस भरती-२०१९ निवड मंडळाने जाहिरात व आवेदन पत्रात नमूद बाबी विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय कळविण्यात येत आहे.**

१. जळगाव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ अनुषंगाने महाराष्ट्र पोलीस दलाचे संकेतस्थळ व जळगांव जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर दिनांक ०३/०९/२०१९ रोजी १२८ पोलीस शिपाई पदांकरिता सामाजिक प्रवर्गनिहाय जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तद्नंतर सामाजिक शैक्षणिक मागासप्रवर्गाचे आरक्षण रद्द केल्यामुळे दिनांक ०५/०८/२०२१ रोजी शुद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामध्ये १२८ पदांकरिता खालीलप्रमाणे सामाजिक/समांतर प्रवर्गनिहाय पदसंख्या जाहिरात व शुद्धीपत्रकात प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | सामाजिक प्रवर्ग | उपलब्ध पदे |
|---|---|---|
| ०१. | अनुसूचित जाती | २६ |
| ०२. | अनुसूचित जमाती | ०८ |
| ०३ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | १३ |
| ०४ | खुला/अराखीव | ८१ |

२. **जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ साठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये खालीलप्रमाणे सुचना स्पष्ट नमूद करण्यात आलेल्या आहेत.**

**उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे/कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वैगैरेची माहिती तपासूनच भरावी. ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण, अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरतांना काही चूका झाल्यास किंवा त्रुटी झाल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज**

नाकारला गेल्यास त्याची सर्व जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती सादर केल्यानंतर बदलता येणार नाही.

**११.५ मध्ये उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्याआधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे.** ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातीचे काळजीपूर्वक वाचन करावे. **जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.**

**१४.९ मध्ये सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल.** पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष, भरती समिती यांनी राखुन ठेवले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

३. **पोलीस भरती-२०१९ साठी ऑनलाईन सादर करावयाच्या आवेदन अर्जामध्ये Category या कॉलममध्ये कंसात ( Category Through which you want to apply for the recruitment) असे नमूद केले आहे.**

**पोलीस भरती-२०१९ साठी ऑनलाईन सादर केलेल्या आवेदन पत्रातील Undertaking यामध्ये अ.क्र.७ मध्ये Candidates are advised that before filling online application, they should first check the Vacancy statement of the concerned Unit and Category in which they wants to apply and should verify that such vacancy exits. Application and candidature of candidates applying to categories which are not available in particular Unit, are lible to be rejected at any stage of recruitment. Such Candidates will also not be able to claim any refund of the application fees made in such case.**

**वर नमूद प्रमाणे पोलीस शिपाई भरती-२०१९ मधील जाहिरात व ऑनलाईन सादर करावयाच्या आवेदन अर्जातील माहिती /सुचनांचे अनुषंगाने तसेच वरिष्ठ कार्यालयाकंडील मार्गदर्शना नुसार या कार्यालयात व जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ साठीच्या भरती समितीकडे सामाजिक आरक्षण बदल करण्याबाबत म्हणजेच ज्या प्रवर्गासाठी जागा उपलब्ध नाहीत त्यामध्ये बदल करणेबाबत/आवेदन अर्ज सादर केलेल्या प्रवर्गात जागा नसल्याने दुस-या प्रवर्गामध्ये सामाविष्ठ करुन घेण्याबाबत तसेच आवेदन अर्ज भरतांना पर्याय नसल्याने प्रवर्ग चुकून निवडला गेल्याबाबत/तांत्रिक चुकांमुळे सहानुभूतीने विचार करण्याबाबत व त्याअनुषंगाने प्राप्त इतर तक्रार/आक्षेप तसेच विनंती अर्ज अमान्य करण्यात येत असुन सदरचे सर्व तक्रार/आक्षेप व विनंती अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.**

पोलीस अधिक्षक कार्यालय जळगांव

१|११|२१

( डॉ. प्रविण मुंढे )
पोलीस अधीक्षक जळगांव

प्रति,

जळगांव जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१९ लेखी परीक्षा निकालाच्या अनुषंगाने हरकती /आक्षेप/विनंती अर्ज सादर करणारे सर्व उमेदवार **(सोबत तक्रार/विनंती अर्ज सादर करणारे उमेदवारांची यादी)**

प्रत :-

पो.नि. स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव.

२/- यांनी सदरहू पत्र जळगांव जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्या बाबत कार्यवाही करावी.